पुढचं पाऊल

**'हाव त्याला दैव' अशी म्हण आहे. येथे 'हाव'चा अर्थ हावरटपणा नसून, काम करण्याचा, प्रगतीचा सोस असा आहे. असा सोस असणाऱ्या माणसाची प्रगती कधी थांबत नाही. तो अडचणीतून मार्ग काढतो, यशस्वी होतो. यज्ञेश सावे हेदेखील अशा यशस्वींपैकी एक. घरच्या साडेतीन एकरांतून आज सावेंनी मोठा पल्ला गाठला आहे. त्यांची ही कथा, त्यांच्याच शब्दांत...**



# प्रयत्नांना फळं...



ठाणे जिल्ह्यातील तलासरी तालुका आदिवासीबहुल आहे. या तालुक्यातील बोरीगाव हे माझे गाव.

घरची परिस्थिती बेताची. रडतखडत दहावी पूर्ण केली. वडील अंध. घरची साडेतीन एकर शेती उत्पन्नाचा एकमेव मार्ग. गुजरात राज्यातील वापी 'जीआयडीसी'मध्ये नोकरीचा मार्ग चोखाळून पाहिला; पण मन रमेना. शेवटी जाणीवपूर्वक शेतीमध्ये उतरायचे ठरवले. १९८३मध्ये शेती करण्याचा 'धाडसी' निर्णय घेतला; पण त्या वेळी अडथळ्यांची-आव्हानांची कल्पना नव्हती. सुरवातीला उत्साह दांडगा होता. नावीन्याचा सोस होता. भाजीपाल्यातून ताजा पैसा मिळेल, या आशेने पहिल्या प्रयत्नात टोमॅटो लागवड केली. सकाळी शेतात जाणे, कमी-जास्त पाहणे, हा रोजचा दिनक्रम झाला; मात्र त्यावर विरजण पडले. नाग अळीचा प्रादुर्भाव झाला. सायपरमेथ्रिनचे फवारे मारूनही फरक पडेना. खर्च वाढतच होता. ... टाकुटीला आलो होतो. पहिल्या वर्षी अपयश पदरी पडले.

शेतीत काही वेगळे करण्याचा सोस स्वस्थ बसू देत नव्हता. म्हैसपालनाचा

**विजय गायकवाड**

व्यवसाय निवडला. दुधाला निश्चित दर मिळण्याची शाश्वती होती. सुरवातीला चार म्हशी होत्या. (आज तीस म्हशी आहेत.) बऱ्यापैकी जम बसत होता. या वेळीही समस्या निर्माण झाल्या. गवताची टंचाई होती. शेतातले गवत पुरेना; म्हणून बाहेरून गवत मागायला सुरवात केली. हंगामात स्वस्तात मिळणारे गवत उन्हाळ्यात मात्र चार पटीने पैसे मोजूनही मिळत नसे. या दरम्यान, म्हशींची संख्या वाढतच होती; पण गवत पुरे पडेना. गवताच्या गरजेतून नवी कल्पना सुचली- गवताच्या शेतीची! गवताची लागवड केली म्हणून गावात चेष्टेचा विषय झाला; मात्र म्हशींच्या चाऱ्याचा प्रश्न तर मिटला होता. पुढे तर गवत शिल्लक पडू लागले. त्याच्या विक्रीचा निर्णय घेतला. गवताच्या गावठी रोडा, बरडी, फुलगवताला मुंबईतील तबेलेवाल्यांकडून मागणी असल्याची माहिती मिळाली. त्यातून गवत विक्रीचा नवा व्यवसाय जोरात सुरू झाला. पुढे या व्यवसायाने चांगलाच जोम पकडला. गवताला मशागत करावी लागत नाही. ना खते ना कीटकनाशके, मार्केट मात्र खात्रीचे...!

धडपडीला यश मिळत होते आणि आता स्थिरता लाभली होती. दुधातून पैसा हाती खुळखुळायला लागला. त्या पैशातून शेती सुधारली. वडिलोपार्जित विहिरीला पुरेसे पाणी नव्हते, म्हणून बोअरवेल घेतला. त्यास पाणी लागले. प्रयत्नांना यश येत होते. वडिलांची साडेतीन एकरांची शेती आता 'प्रयोगांसाठी' अपुरी पडू लागली होती. धाडस करून २५ एकर जमीन खरेदीसाठी डोके लावले. 'चिकू' व 'आंबा' लागवडीचे प्रयोग सुरू केले.

कुठल्याही एकाच पिकावर अवलंबून राहायचे नाही, ही समज अनुभवातून मिळते, त्यामुळे दूध आणि गवत विक्री व्यवसायानंतर मिश्रफळबागेच्या प्रयोगाकडे वळलो. कुठल्याही शास्त्रीय माहितीचा आधार न घेता केवळ अनुभवावर आधारित मिश्रफळबाग लागवडीचा प्रयोग केला. दोन चिकूच्या झाडांमधील ४० x ४० फूट, तर आंब्यासाठी २० x २० फूट अंतर ठेवले. चिकूच्या वाढीसाठी सात-आठ वर्षांचा कालावधी लागतो, तर आंब्याचे पीक तीन वर्षांतही सहज हाती येते, त्यामुळे आंब्याचे उत्पादन हे चिकूच्या पूर्ण वाढीपर्यंत घेण्यात येईल. त्यानंतर जशी गरज पडेल त्यानुसार आंब्याची छाटणी केली जाईल. या मिश्रपद्धतीचा फायदा असा, की चिकूच्या वाढीच्या कालावधीत आंब्याचे किमान सात ते आठ वर्षे चांगले उत्पादन मिळते. लागवडीचा आणि व्यवस्थापनाचा खर्च निघून जातो. एका दगडात दोन पक्षी!

दरम्यानच्या काळात तलासरीतील जमिनींना 'भाव' येऊ लागले होते. मुंबईतील अनेक व्यापाऱ्यांनी या भागात जमिनी विकत घ्यायला सुरवात केली होती. जमिनी घेतल्या; पण त्यांची देखभाल करणार कोण? यज्ञेशच्या कौशल्याचा येथे कस लागणार होता. यज्ञेशनी या व्यापाऱ्यांना भेटून 'जमीन तुमची कष्ट आमचे..!' या तत्त्वावर १०० एकर जमीन कसायला घेतली.

आता माझ्याकडे १५० मजूर काम करतात. व्यापाऱ्यांच्या १०० एकरांत चिकू-आंब्याची मिश्र लागवड केली आहे. गुंतवणूक त्यांची; आंतरपिकांचे उत्पादन माझे, असा साधा व्यवहार आहे. आंतरपिकांत भाजीपाला लागवड करून मलाही खात्रीचे उत्पन्न सुरू आहे. मासेमारी हा हंगामी व्यवसाय आहे. त्यात कराराने मत्स्यतळी घेतली जातात. त्यातून चांगला पैसा मिळतो. मासेमारीच्या करारात आठवडाभरात दीड लाखांपर्यंत मिळकत होऊ शकते. मध्यंतरी फुलशेतीचा 'ट्रेंड' आला. पत्नी सौ. शीतलला फुलशेतीतील आवड होतीच. हायटेक नव्हे, पण शेवंती, अबोली, कागडा, मोगरा, झेंडूचे यशस्वी प्रयोग केले. फक्त उत्पादन नाही, तर हार-तुरे-तोरणे बनवून विकायला सुरवात केली. विशेष करून दिवाळी दसऱ्याला वापीच्या (गुजरात) औद्योगिक पट्ट्यामध्ये फुलांना व हारतुऱ्यांना मोठी मागणी असते. वडिलांच्या पारंपरिक शेतीला आधुनिक स्वरूप आलेय. भाजीपाला लागवडीतून पैसा हाती आलाय. आता मोठे शेडनेट उभारायचेय त्यासाठीची प्राथमिक तयारी पूर्ण झालीय.

वर्षाचे नियोजन कसे फिट्ट बसले. ऑक्टोबरमध्ये हंगाम सुरू होतो. त्या सुमारास नैसर्गिकरीत्या वाढलेल्या आणि काही प्रमाणात लागवडीखाली आणलेल्या गवताचा हंगाम सुरू होतो. कापणी, बांधणी व वाहतूक अशी कामे चालतात. नंतर विकलेल्या गवताची वसुली होते. 'गवताचा धंदा' नोव्हेंबर-डिसेंबरपर्यंत चालतो. जानेवारी म्हणजे टोमॅटो लागवडीचा हंगाम. नववर्षाच्या सुरवातीला लागवडपूर्व तयारी करून, कोणत्याही परिस्थितीत १५ जानेवारीपर्यंत टोमॅटोची लागवड ही झालीच पाहिजे हा दंडक. त्यामुळे पुढील बाजाराचे नियोजन करणे शक्य होते. यादरम्यान इतर भाजीपाल्याचे नियोजन करता येते. एप्रिलच्या सुरवातीलाच आंब्याचा हंगाम चालू होतो. आंबे काढून, पॅकिंग करून शेवटी बाजारापर्यंतचे नियोजन स्वतः करतो. मे महिन्यात मत्स्यतळ्यांचा करार होतो. आठवडाभरात पैसा मोकळा करायचा असतो. जून-जुलैत धरणातील माशांचा हंगाम; ऑगस्ट-सप्टेंबर हा पूर्ण भाजीपाल्याचा हंगाम असतो. वांगी, दुधी, पडवळ, तोंडली, ढोबळी मिरची या ठरलेल्या भाज्या. त्यानंतर ऑक्टोबर पुन्हा गवताचा धंदा, असे वर्षभराचे नियोजन ठरलेले..!

**संपर्क**
यज्ञेश वसंत सावे,
(९८२२५९०५१२)
बोरीगाव, पो. बोर्डी,
ता. तलासरी, जि. ठाणे